# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**मुंबईतील अग्निशमन दलासाठी लागणाऱ्या महानगरपालिकेच्या जलविभागाच्या टँकरबाबत**

**(१) २००९१ (११-०८-२०१५). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अग्निशमन दलाच्या मदतीसाठी जलविभागातील कपलिंग विना असलेले टँकर मधील पाणी देण्यात वेळेचा अपव्यय होत असून एखाद्या इमारतीला भीषण आग लागल्यानंतर ती विझविण्याकरिता अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांना तारेवरची कसरत करावी लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अग्निशमन दलास उपयोगी पडेल अशी यंत्रणा जलविभागाच्या टँकरवर मुंबई महानगरपालिकेने न बसविण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, महापालिकेच्या जलविभागाच्या टँकरचा दर्जा वाढविण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे व त्याचे स्वरूप काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-११-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) एखाद्या ठिकाणी आग लागल्यानंतर प्रथमत: बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाच्या टँकरद्वारे आग विझविण्यात येते.

तथापि, अत्याधिक गरज भासल्यास आपत्कालीन परिस्थितीत महापालिकेच्या जल विभागातील टँकर्सचा वापर करण्यात येतो.

जल विभागाच्या टँकरचा उपयोग मुख्यत्वे मुंबईतील विविध विभागांस पिण्याचे पाणी पुरविण्याकरिता करण्यात येतो. त्यामुळे या विभागाच्या टँकरवर अग्निशमन दलास आवश्यक असलेली कपलिंग बसविण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) मुंबई अग्निशमन दलाच्या आवश्यकतेनुसार मागणीनुसार जल विभागातील टँकरवर भारतीय मानकाप्रमाणे महापालिकेमार्फत कपलिंग बसविण्याचे काम हाती घेण्यात आले असून, तीन टँकर्सवर सदर कपलिंग बसविण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुस्लीम जमत (चकाला अंधेरी पूर्व) मुंबई पश्चिम उपनगर येथील प्रार्थना स्थळ विवादासंदर्भातील इम्रान एस लोरेकर यांच्यावर कारवाई करण्याबाबत**

**(२) २८८६१ (२१-०१-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुस्लीम जमत (चकाला अंधेरी पूर्व), मुंबई पश्चिम उपनगर येथील प्रार्थना स्थळ विवादासंदर्भातील गैर अर्जदार इम्रान एस लोरेकर यांच्यावर चौकशीअंती कारवाई करण्याबाबतची मागणी जनप्रतिनिधी, प्रार्थना स्थळांचे पदाधिकारी, स्थानिक नागरिक व सेवाभावी कार्यकर्ते यांनी दिनांक १ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, मा.गृह राज्यमंत्री, पोलीस आयुक्त (बृहन्मुंबई पोलीस दल), अतिरिक्त आयुक्त (उत्तर पश्चिम), अतिरिक्त पोलीस आयुक्त (गुन्हे), बृहन्मुंबई पोलीस दल, संबधित पोलीस उपयुक्त व त्यांच्या अधिनस्त असलेले सहाय्यक पोलीस आयुक्त, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशीअंती कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१०-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) दिनांक ०५.०४.२०१५ रोजी तक्रारदार यांनी गैरअर्जदार इम्रान सुलेमान लोरकर यांच्याविरुध्द दिलेल्या तक्रारीवरुन अंधेरी पोलीस ठाण्यात त्यांच्या विरुध्द अदखलपात्र गु.क्र. ७०१/२०१५ कलम ५०४, ५०६ भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. नमूद अदखलपात्र गुन्हा तसेच तक्रार अर्जाच्या अनुषंगाने चाप्टर केस क्र. ११८/२०१५ कलम १०७ फौ.दं.प्र.सं. कोर्ट केस नं. २८८/२०१५ अन्वये प्रतिबंधक कारवाई करण्यात आली असून सदर प्रकरणी सुनावणी अंती कलम ११८ फौ.दं.प्र.सं. अन्वये निकाली काढण्यात आली आहे.

दिनांक २५.०८.२०१५ रोजी एशियन वेलफेअर सोसायटी तसेच पारशीवाडा मस्जिद ट्रस्टचे सदस्य यांची वरिष्ठ पोलीस निरिक्षक अंधेरी पोलीस ठाणे यांच्याकडे बैठक आयोजित केली असता त्यामध्ये मस्जिदचे मालकीकरुन, बांधकामावरुन व मस्जिद कमिटी निवडणूक यावरुन वाद असल्याचे समजले त्यानुसार सदर विषय धर्मादाय आयुक्त यांच्याशी संबंधित असल्याने दोन्ही पक्षकारांना त्यांच्याकडे रिव्हीजन ॲप्लीकेशन नं.५०३/२०१५ अन्वये दाद मागितली आहे. तसेच दिंडोशी सिटी सिव्हीलकोर्ट केस न. २२८८/२०१५ अन्वये रिट पिटीशन दाखल केले असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. सदर मिटींगमध्ये दोन्ही पक्षकारांना कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत आवाहन करण्यात आले आहे. एशियन वेलफेअर सोसायटी तसेच पारशीवाडा मस्जिद ट्रस्टचे सदस्य यांना दिनांक २५.०८.२०१५ रोजी शांतता राखावी म्हणून फौ.दं.प्र.सं. कलम १४९ अन्वये प्रतिबंधक कारवाई अंतर्गत नोटीस देण्यात आली आहे. सदर ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणून बिट अधिकारी व अंमलदार, बिट मार्शल, गस्तीवरील वाहने व त्यावरील अंमलदार यांची सदर ठिकाणी गस्त ठेवण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवी मुंबईतील पनवेल नगरपालिकेच्या कर्मचा-यांनी एकाच खडडयात १२ बेवारस मृतदेह पुरल्याबाबत**

**(३) २९२२७ (२१-०१-२०१६). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील पनवेल नगरपालिकेच्या कर्मचा-यांनी एकाच खडडयात १२ बेवारस मृतदेह पुरले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापुर्वीही बेवारस मुतदेह एकाच खडडयात पुरल्याची माहिती दिनांक २० नोव्हेंबर, २०१४ रोजी निदर्शनास आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बेवारस मृतदेह एकाच खडयात पुरल्याबाबत पनवेल नगरपरिषदेने आरोग्य विभागाच्या दोन सफाई कर्मचा-यांना निलंबित केले असून आरोग्य निरीक्षकांची चौकशी करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी दोषी असलेल्या सर्व संबंधित अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली अथवा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-१०-२०१६) :**(१) व (२) होय, अशा स्वरुपाची घटना घडल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी मुख्याधिकारी, नगरपरिषद पनवेल यांच्याकडून संबंधितांविरुध्द विभागीय चौकशीची कारवाई करण्यात येत आहे.

याबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांना त्यांच्या स्तरावर चौकशीची कारवाई करण्याबाबत सुचित करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सावंतवाडी मधील माडखोल येथील बंद असलेले श्रीदेवी पावणाई मंदिर खुले करुन धार्मिक कार्यक्रमासाठी परवानगी देण्याबाबत**

**(४) ३४६१७ (१४-०१-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावंतवाडी मधील माडखोल येथील बंद असलेले श्रीदेवी पावणाई मंदिर लवकरात लवकर खुले करुन धार्मिक कार्यक्रमासाठी परवानगी देण्यात यावी अशी मागणी माडखोल येथील ग्रामस्थांनी तहसीलदार, उपविभागीय अधिकाऱ्यांकडे नुकतीच माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी निर्णय घेण्यात आला आहे काय, असल्यास त्याचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) देवस्थान व्यवस्थापन समितीने ठराव मंजूर करून श्री पावणाई मंदिर खुले करण्याबातचे आदेश सावंतवाडी उप कार्यालयास दिले. त्यानुसार दि. ०७.०४.२०१६ पासून श्री.पावणाई मंदिर भाविकांच्या दर्शनासाठी व धार्मिक कार्यक्रमांसाठी खुले करुन देण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सिडको आणि जेएनपीटी यांनी भूसंपादित केलेल्या देवस्थानाच्या जमिनीबाबत**

**(५) ४०१५० (१७-०५-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिडको आणि जेएनपीटी यांनी संपादित केलेल्या देवस्थानाच्या जमिनी गेले अनेक वर्षे शेतकरी कसत असून सदर जमिनी संपादित करतांना तेथील जमिनीवर लागलेल्या कुळांना संपादनाच्या नुकसान भरपाई पोटी ७५ टक्के इतकी रक्कम देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जमिनींना इतरांप्रमाणे १२ टक्के जमिनी देत असताना सदर देवस्थानाच्या जमिनीतूनच देवस्थानाची देखभाल होत असल्याने इतर जमिनी प्रमाणे याही जमिनींना १२ टक्के प्रमाणे दिल्यास देवस्थानाची देखभाल करणे शक्य होईल, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०९-२०१६) :**(१), (२), (३) व (४) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प बाधितांच्या मागण्यांबाबत दि.२५.५.२०१६ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयाच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार ट्रस्ट व देवस्थानाच्या जमिनीमधील कुळांना १२.५% योजनेनुसार भूखंड वाटप करण्याच्या अनुषंगाने सर्व बाबींचा विचार करुन योग्य तो निर्णय घेण्याबाबत सिडको महामंडळस निर्देश देण्यात आलेले आहेत.

---

**नवी मुंबई सिडकोने धार्मिक व सामाजिक संस्थांना**
**धार्मिक स्थळे उभारण्यासाठी भूखंड दिल्याबाबत**

**(६) ४०१६१ (१६-०५-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई, पनवेल, उरण या भागात ४६७ बेकायदेशीर धार्मिक स्थळे असल्याने त्यावर कारवाई करण्याचे आदेश मा.मुंबई उच्च न्यायालयाने शासनास २ महिन्यापूर्वी दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे सप्टेंबर, २००९ पूर्वीच्या बेकायदेशीर धार्मिक स्थळांना अभय देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवी मुंबईत सिडकोने धार्मिक व सामाजिक संस्थांना धार्मिक स्थळे उभारण्यासाठी किती अधिकृत भूखंड दिलेले आहेत, या भूखंडांचा अभय देण्याच्या निर्णयात समावेश आहे काय,

(४) असल्यास, या अनधिकृत धार्मिक व सामाजिक संस्थांना सिडको पर्यायी भुखंड देणार काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-१०-२०१६) :**(१) होय.

(२) मा.सर्वोच्च न्यायलायाने पिटीशन फॉर लिव्ह टू सिव्हिल अपिल क्र. ८५१९ मध्ये दि.२९.९.२००९ व त्यानंतर दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने गृह विभाग शासन निर्णय दि.५ मे, २०११ व १८ नोव्हेंबर, २०१५ नुसार दि.२९.९.२००९ पूर्वीच्या धार्मिक स्थळांबाबत कायदा व सुव्यवस्था, वाहतुक, लोकमान्यता, विकास नियंत्रण नियमावली, जमीन मालकाची संमती आणि विकास आराखडा या बाबी विचारात घेऊन धार्मिक स्थळांचे बांधकाम निष्कासित करणे/नियमित करणे/स्थलांतरीत करणे यासंबंधी सूचना देण्यात आलेल्या असून त्याकरिता कालबध्द कार्यक्रम आखून देण्यात आलेला आहे.

(३) व (४) सामाजिक सेवा विभागाच्या अभिप्रायानुसार धार्मिक स्थळांना व त्या न्यासांना भूखंड वाटप करावयाच्या धोरणास अनुसरुन शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार नवी मुंबई क्षेत्रातील विविध संकुलात वृत्तपत्र जाहिरातीद्वारे १३६ भूखंडाचे वाटप करण्यात आले आहे.

तथापि, अनधिकृत धार्मिक व सामाजिक संस्थांना पर्यायी भूखंड देण्याचे सिडकोचे धोरण नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उरण तालुक्यातील (जि.रायगड) पागोटे, केगाव तसेच खोपटे गावातील समस्या**
**तसेच चिरनेर भूमितील नळीकाग्रस्तांना न्याय देण्याबाबत**

**(७) ४०१७० (१३-०५-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण तालुक्यातील (जि.रायगड) पागोटे, केगांव तसेच खोपटे गावातील समस्या तसेच चिरनेर भूमितील नळीकाग्रस्तांना न्याय देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास सिडको प्रशासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०९-२०१६) :**(१) होय.
(२) व (३) "नवी मुंबईमधील द्रोणागिरी नोड येथे सिडको अंशदान योजनेअंतर्गत ग्रामपंचायत पागोटेमध्ये विविध पायाभूत विकास कामे करणे" या कामाअंतर्गत गावात पेव्हर ब्लॉकचे रस्ते, आर.सी.सी.पाईप गटारे व पाणीपुरवठा वाहिनी इ. कामे करण्यात येत आहेत.

"द्रोणागिरी नोड येथे सिडको अंशदान योजनेअंतर्गत ग्रुप ग्रामपंचायत केगावमध्ये विविध पायाभूत विकास कामे करणे" बाबतच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.

चिरनेर व खोपटा ही गावे प्रस्तावित नवी मुंबई विकास आराखड्यात समाविष्ट करण्यात आलेली नाहीत.

---

**पुण्यातील बालेवाडी परिसरामध्ये ससून रुग्णालयाच्या धर्तीवर श्रीमंत छत्रपती शाहू महाराज रुग्णालय उभारण्याबाबत**

**(८) ४१२७१ (०३-०५-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुण्यातील बालेवाडी परिसरामध्ये ससून रुग्णालयाच्या धर्तीवर श्रीमंत छत्रपती शाहू महाराज रुग्णालय उभारण्यास २०१३ साली मान्यता व निधी उपलब्ध असतांनाही अद्याप कोणतीच कार्यवाही होत नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बालेवाडी येथे सर्व्हे क्र. ४/१ या गायरान जागेत बाणेर-बालेवाडी, पाषाण व आसपासच्या परिसरातील नागरिकांसाठी या ठिकाणी सुसज्ज रुग्णालय उभारण्यासाठी माजी लोकप्रतिनिधी यांनी राज्य शासनासह पुणे महापालिकेकडे पाठपुरावा केला असून त्याकरिता प्राथमिक टप्प्यात दोन कोटी रुपये मंजूर होऊन ८१ लाख रुपयांचा निधी तातडीने उपलब्ध करून देण्यात आला असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जवळपास ३ वर्षांचा कालावधी उलटूनही संबंधित अधिकारी कोणतीच कार्यवाही करत नसल्याने मंजूर निधीचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू रुग्णालय उभारणीच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-१०-२०१६)** :(१) हे खरे नाही. कारण सदर ठिकाणी रूग्णालय बांधण्यासाठी रू २.०० कोटी निधी उपलब्ध झाला असून त्यानुसार रूपये १,९९,९४,५११.०० पर्यंतचे पुर्वगणनपत्रक तयार करून आवश्यक मान्यता घेण्यात आली आहे. सदर कामासाठी निविदा काढण्यासाठी जागा पुणे महानगरपालिकेकडे हस्तांतरीत होणे आवश्यक आहे. सदरची जागा पुणे महानगरपालिकेस उपलब्ध झालेली नाही.
(२), (३), (४) व (५) रूपये २.०० कोटी निधी उपलब्ध झाल्यानुसार पुर्वगणनपत्रक मान्यतेची प्रक्रिया केलेली आहे. प्रत्यक्ष जागा ताब्यात आल्यावर टेंडर प्रक्रिया व पुढील कार्यवाही करणेत येईल. तथापि, अद्याप जागा पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात आलेली नाही. जागा मिळण्याबाबत संबंधीत शासकीय विभागाकडून प्रयत्न करण्यात येत आहेत.

---

### कोल्हापूर शहरातील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय छ.शाहू स्मारकाबाबत

**(९) ४१८३६ (१३-०५-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर शहरातील शाहू मिलच्या जागेमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे रा.छ.शाहू महाराजांचे स्मारक उभारण्याच्या शासनाच्या घोषणेला सुमारे ३ वर्षांचा काळ लोटला तरी अद्याप स्मारक उभारण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्मारकासाठी वस्त्रोद्योग महामंडळाकडून जागा शासनाने ताब्यात घेतली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या जागेवर शाहू स्मारक संकल्पनेचा प्राथमिक आराखडा तयार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर स्मारकाचे काम पुर्ण होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१६)** :(१) होय.
(२) नाही.
(३) महानगरपालिका कोल्हापूर यांनी आराखडा तयार केला आहे.
(४) जागा हस्तांतरणाची कार्यवाही पूर्ण झाल्यावर स्मारक उभारण्याची कार्यवाही करण्यात येईल.

---

### राज्यात राबविण्यात येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियांनासाठी स्वच्छ महाराष्ट्र कोष स्थापन करण्याचा निर्णय

**(१०) ४२००९ (२८-०४-२०१६). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राबविण्यात येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियांनासाठी स्वच्छ महाराष्ट्र कोष स्थापन करण्याचा निर्णय दिनांक २४ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कोषाची रचना कशी निश्चित करण्यात आली आहे व त्यामार्फत कोण-कोणती कामे करण्यात येणार आहेत,
(३) असल्यास, यासाठी किती निधीचा आवश्यकता आहे, हा निधी कशाप्रकारे उपलब्ध करण्यात येणार आहे व सध्या प्रत्यक्षात किती निधी उपलब्ध करण्यात आलेला आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) स्वच्छ महाराष्ट्र अभियानातंर्गत नागरी व ग्रामीण भागात अनुज्ञेय असलेल्या कामासाठी केंद्र व राज्य शासनाकडील निधी व्यतिरिक्त इतर स्त्रोतामधून निधी उपलब्ध करुन देण्याकरीता स्वच्छ महाराष्ट्र कोषची स्थापना करण्यात आली असून कोषची रचना पुढीलप्रमाणे आहे :

| | | |
|---|---|---|
| १ | मा.मुख्यमंत्री | - अध्यक्ष |
| २ | मा.मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता | - उपाध्यक्ष |
| ३ | मा.राज्यमंत्री, नगर विकास | - सदस्य |
| ४ | मुख्य सचिव, | - सदस्य |
| ५ | अपर मुख्य सचिव, वित्त विभाग | - सदस्य |
| ६ | प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग | - सदस्य |
| ७ | प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग | - सदस्य |
| ८ | सचिव (नवि-२), नगर विकास विभाग | - सचिव |
| ९ | राज्य अभियान संचालक,<br>स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) | - कोषाध्यक्ष |

(३) कंपनी अधिनियम, २०१३ नुसार कंपन्यांना होणाऱ्या नफ्यापैकी किमान २ टक्के निधी कार्पोरेट सोशल रिसपॉन्सीब्लीटी (CSR) अंतर्गत खर्च करावयाचा आहे. त्यानुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत अनुज्ञेय कामासाठी कंपन्यांना शहरे/गावे दत्तक घेता येतील किंवा त्या कामांसाठी निधी उपलब्ध करुन देता यावा यासाठी “स्वच्छ महाराष्ट्र कोष” निर्माण करण्यात आला आहे. स्वच्छ महाराष्ट्र कोषमध्ये आतापर्यंत निधी उपलब्ध झालेला नाही.
(४) कार्पोरेट कंपन्याकडून प्रतिसाद न मिळाल्यामुळे स्वच्छ महाराष्ट्र कोषमध्ये निधी उपलब्ध झालेला नाही.

___

## नवी मुंबईतील मोकळया भूखंडावर प्रकल्पग्रस्तांकडून भाडे न आकारण्याबाबत

**(११) ४४१३७ (०३-०५-२०१६). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई शहराच्या निर्मितीसाठी सिडकोने हजारो ग्रामस्थांच्या जमिनी संपादित केल्या त्याच्या बदल्यात खेळाचे मैदान, समाजमंदीर उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन देऊनही ते पाळले नाही, त्यामुळे प्रकल्पग्रस्तांना मोकळया भूखंडावर घरगुती वा सामाजिक कार्यक्रम आयोजित करावे लागतात व त्यासाठी सिडको मोठया प्रमाणावर प्रकल्पग्रस्तांकडून भाडे वसुल करत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोकळया भूखंडाचा वापर केल्यास भाडे आकारु नये अशी मागणी एका संघटनेने सिडकोकडे केली आहे याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार प्रकल्पग्रस्तांनी वापर केलेल्या भूखंडाचे भाडे न आकारण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-१०-२०१६) :**(१) अंशतः खरे आहे.

(२) व (३) सिडको महामंडळाने खेळाचे मैदान, समाज मंदिर इत्यादीसाठी विविध नोड्स मध्ये भूखंड उपलब्ध करुन दिले आहे. परंतु सामाजिक कार्याक्रमाव्यतिरिक्त अन्य प्रयोजनार्थ मोकळ्या भुखंडाचा वापर करण्यासाठी प्रकल्पग्रस्तांकडून भाडे आकारु नये अशी मागणी दि.६.१.२०१६ च्या पत्रानुसार संघटनेने सिडकोकडे केली आहे. तथापि, अशा प्रकारे कोणताही भूखंड विनामुल्य देण्याची तरतूद सिडको नियमावलीत नाही.

सिडको संचालक मंडळाने मंजूर केलेला ठराव क्रमांक ७८१९ दि. ७.१०.१९९८ व ठराव क्रमांक १०९५३ दि. २७.१२.२०१३ नुसार सर्कस, सण, मेळावा, मनोरंजन इ. प्रयोजनासाठी राखीव किंमतीच्या १.५०% प्रती स्क्वे.मी. प्रती आठवडा आणि लग्न व इतर वाणिज्य प्रयोजनासाठी राखीव किंमतीच्या १.००% प्रती स्क्वे.मी. प्रती दिन तर धार्मिक / समाजिक प्रयोजनासाठी राखीव किंमतीचा ०.०१५% प्रती स्क्वे.मी. प्रती दिन इतके नाममात्र शुल्क आकारण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील विविध प्रादेशिक विभागातील उच्च/व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्यांक समाजातील विध्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीबाबत

**(१२) ४६७४४ (२८-०४-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध प्रादेशिक विभागातील उच्च/व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्यांक समाजातील विध्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्तीबाबतच्या समस्या लक्षात घेता तसेच त्या अनुषंगाने अल्पसंख्यांक समूह घटकातील कुशल व अकुशल बेरोजगारांची समस्या परिणामकारक पद्धतीने सोडविण्यासाठी प्रादेशिक व जिल्हा स्तरीय सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान बेरोजगार सेवाभावी संस्था यांनी लेखी निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर नगरपरिषद यांनी टेंभोळे, अल्याळी भागातील गट क्र. ७४ मध्ये खारभूमी सर्वेक्षण व अन्वेषण विभागाच्या जागेतून सातपाटी खाडीत मल:मिश्रीत पाणी सोडल्याबाबत**

**(१३) ४७४०५ (१६-०५-२०१६). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर नगर परिषद, यांनी टेंभोळे, अल्याळी भागातील गट क्र. ७४ मध्ये खारभूमी सर्वेक्षण व अन्वेषण विभागाच्या जागेत तहसिलदार व प्रांताधिकारी, पालघर यांची रॉयल्टी न घेता विना परवानगी खोदकाम करुन शहरातील गटारे, मल:मिश्रीत पाण्यासह औद्योगिक परिसरातील प्रदूषित पाणी अल्याळी, धनसार, आयतऱ्यामार्गे सातपाटी-मुरबे खाडीत बेकायदेशीरपणे सोडल्यामुळे खाडीतील शिंपले, कालवे, चिंबोरी, बोय व इतर माशांना रॉकेल मिश्रित रसायनाचा वास येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू खाडीची प्रदुषित पाणेरी नाल्यासारखी अवस्था निर्माण झाल्याने खाडीतील जलसंपदा नष्ट होऊन खाडीवर उदरनिर्वाह करणारी शेकडो कुटुंबे बेरोजगार झाली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच खार भूमी अधिकारी, पालघर यांनी हलगर्जीपणा करुनही त्यांच्यावर अद्यापि गुन्हे दाखल केले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पालघर नगर परिषद, यांनी भुयारी गटार योजना व त्या अनुषंगाने शुध्दीकरण प्रकल्प राबविण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडून भुयारी गटार योजनेचा अहवाल तयार करण्यात आला असून सद्य:स्थितीत सदरचा अहवाल संचालक, नगरपालिका प्रशासन, वरळी मुंबई यांच्याकडे मंजूरीकरीता पाठवण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**डहाणू नगरपरिषद (जि.पालघर) क्षेत्रात नागरी समस्यांकडे दुर्लक्ष होत असल्याबाबत**

**(१४) ४८९१८ (०७-०५-२०१६). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डहाणू नगरपरिषद (जि.पालघर) क्षेत्रातील सरावली येथील शिवाजी नगरमधील शाळेतील मुलांना रस्त्याअभावी चिखलातून जावे लागत असून पाणी साचून डबक्यांना गटाराचे स्वरुप आले असून, रस्ते, वीज, प्राथमिक सुविधा, सार्वजनिक शौचालये, सांडपाण्याचा निचरा इत्यादी नागरी समस्यांकडे कायम दुर्लक्ष होत असल्याचे दिनांक १८ जानेवारी, २०१६ रोजी निदर्शनास आलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व तदनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०१६) :**(१) व (२) सदर ठिकाणी सिमेंट काँक्रेट तसेच कच्चे रस्तेही आहेत. पावसाळ्यामध्ये काही भागात पाणी साचते ही वस्तुथिती आहे.

नगरपरिषदेने काही ठिकाणी एलईडी व सिएफएल पथदिवे लावले असून सार्वजनिक शौचालय बांधण्यात आले आहेत.

नवीन सार्वजनिक शौचालय बांधण्याचे व कच्चे रस्ते पक्के करण्याबाबतच्या बाबी प्रस्तावित आहेत.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**औरंगाबाद महानगरपालिकेत अनेक वर्षांपासून विमुक्त जाती व भटक्या जमाती संवर्गाचे ४१ पदे रिक्त असल्याबाबत**

**(१५) ४८९३८ (१७-०५-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिकेत अनेक वर्षांपासून विमुक्त जाती व भटक्या जमाती संवर्गाचे ४१ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापालिकेच्या आस्थापनेवरील २ उपायुक्त पदे एकाच प्रवर्गातून भरण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर रिक्त असलेली पदे भरण्यात येणार आहेत काय,

(५) असल्यास, कधीपर्यंत भरण्यात येणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-१०-२०१६) :**(१) होय, अंशत: हे खरे आहे.

दि.३१/१०/२०१५ रोजीच्या स्थितीनुसार वि.जा.भ.ज. प्रवर्गातील सरळसेवेची ३० पदे रिक्त असून पदोन्नतीने भरावयाची ०७ पदे रिक्त आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) व (५) दि.४/५/२००६ च्या शासन निर्णयानुसार महानगरपालिकेचा आस्थापना खर्च ३५ टक्केपेक्षा जास्त असल्याने सरळसेवेची रिक्त असलेली ३० पदे भरण्यात आलेली नाही.

तसेच पदोन्नतीच्या ११ रिक्त पदांपैकी ०४ पदे भरण्यात आलेली असून ०७ पदे भरण्याबाबत प्रस्तावित आहे.

---

## कर्जत येथील भिसेगांव येथे गोसावी व इतर समाजातील लहान मुलांच्या दफनभूमीसाठी जागा देण्याबाबत

**(१६) ५०३३१ (२९-०४-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत येथील भिसेगांव परिसरातील दफनभूमीच्या जागा अरिहंत विकासकाने गृह प्रकल्पासाठी खेरेदी केल्याने गावातील गोसावी व इतर समाजातील लहान मुलांच्या दफनभूमीसाठी जागाच नसल्याबाबतची तक्रार तेथील ग्रामस्थ व लोकप्रतिनिधी यांनी माहे जानेवारी-फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या सुमारास केल्याची निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिसरात लहान मुलांचे दफन करण्यासाठी ग्रामस्थ गेले असता अरिहंत विकासकांच्या व्यवस्थापकांनी विरोध केल्याने तेथील ग्रामस्थामध्ये असंतोष पसरला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-१०-२०१६)** :(१) सदरची जमिन ही खाजगी मालकीची असून त्याचा सर्वे नं.५२/३३ अ ब क असा असून जिल्हाधिकारी रायगड यांनी बिगरशेतीसाठी परवानगी दिली आहे. नगरपरिषदेने कागदपत्राच्या पुर्ततेच्या अधिन राहून सदर प्रकल्पाच्या बांधकामास परवानगी दिली आहे. सदर जागेवर उपलब्ध कागदपत्रातील माहितीनुसार कोणत्याही स्मशानभुमीचा उल्लेख नाही. दि. १८/१२/२०१४ रोजी ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या पत्रामध्ये सदर जमिनीवर विकासकाने केलेल्या विकासाबाबत ग्रामस्थांची हरकत नसल्याचे कळविले आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खेड (जि.रत्नागिरी) येथील मीनाताई ठाकरे नाट्यगृहाच्या दुरुस्तीवर लाखो रुपयांचा निधी खर्च होऊनही अद्याप नाट्यगृह सूरु झाले नसल्याबाबत

**(१७) ५१४५७ (१३-०५-२०१६). श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.रत्नागिरी) येथील मीनाताई ठाकरे नाट्यगृहाच्या दुरुस्तीवर लाखो रुपयांचा निधी खर्च होऊनही नाट्यगृह अजूनही सुरु झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नाट्यगृहाच्या दुरुस्तीसाठी १३ व्या वित्त आयोगातून ६० लाख निधीची तरतूद करुन प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात आला होता, मात्र अद्यापही या प्रस्तावास मंजुरी देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येथील खांबतळ्याच्या सुशोभिकरणासाठी ७ कोटी रुपये मंजूर करुनही या निधीतील एक रुपयाही खर्च झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रश्न भाग २ व ३ बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०१६)** :(१) स्वर्गीय मीनाताई ठाकरे नाटयगृह सन २००५ मधील अतिवृष्टीमुळे नाटयगृहातील सीलींगचा भाग पडून व २००८ मधील फयान वादळामुळे नाटयगृह २००७ ला बंद पडले आहे.

(२) नाटयगृह दुरूस्तीकरता वैशिष्टयपूर्ण योजनेअंतर्गत रूपये २५ लक्ष रकमेला प्रशासकीय मंजूरी प्राप्त झाली, प्राप्त रक्कमेतून व नगरपालिका निधी असे एकूण रू.५० लक्ष इतक्या रक्कमेमधून नाटयगृहावरील पत्रा शेड, सिलिंग, प्लॅस्टरची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. याव्यतिरिक्त सन २०१५-१६ मध्ये जिल्हा नगरोत्थान निधीअंतर्गत रू.१८,८३,६२५/- इतके अनुदान प्राप्त झाले आहेत. प्राप्त अनुदान व नगरपालिका निधी असे एकूण २६.११ लक्ष रूपयाची नाटयगृहाच्या स्टेज, ड्रेपरी, स्टेज लाईटिंग इत्यादीची कामे ई-निविदा प्रक्रिया पूर्ण करून हाती घेण्यात आलेली आहेत. नाटयगृहाची कामे डिसेंबर, २०१६ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन नगरपरिषदेने केलेले आहे.

(३) व (४) हे खरे नाही. नगरपरिषदेला महाराष्ट्र शासनाच्या सरोवर संवर्धन योजने अंतर्गत रू.७,८४,१४,०३१/- एवढया रक्कमेला प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. यापैकी पहिल्या टप्यांत रू.१.०० कोटी इतका निधी नगरपरिषेदला प्राप्त झाला असून त्यापैकी रू. ९८.७१ लक्ष खर्च झालेले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खेड तालुक्यात (जि.पुणे) हद्दीत हॉटेल मध्ये अवैद्य दारू विक्री, मटका, गुटका विक्री असे अवैद्य धंदे सुरु असल्याबाबत**

**(१८) ५२१६१ (२०-०५-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड (जि.पुणे) तालुक्यात हद्दीत हॉटेलमध्ये अवैध दारू विक्री, मटका, गुटका विक्री असे अवैध धंदे सुरु असून सदर अवैध धंदे बंद करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी गृह राज्यमंत्री यांस दि. ३ फेब्रुवारी, २०१५ रोजी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांच्या समवेत दिनांक ६ फेब्रुवारी, २०१६ रोजी बैठक घेऊनही दुर्लक्ष करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) पोलीस अधीक्षक,पुणे ग्रामीण यांचे समवेत दिनांक ६/२/२०१६ रोजी झालेल्या बैठकीमध्ये खेड (जि.पुणे)तालुक्यातील हॉटेलमध्ये अवैध दारु विक्री,मटका,गुटका विक्री याबाबत कोणताही मुद्दा उपस्थित न झाल्यामुळे त्याप्रकरणी कोणत्याही अधिका-यावर कारवाई करण्यात आलेली नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दौंड नगरपरिषद हद्दीतील पुणे-सोलापूर रेल्वे लाईनवर भुयारी मार्गाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(१९) ५२२६४ (१६-०५-२०१६). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौंड नगरपरिषद हद्दीतील पुणे-सोलापूर रेल्वे लाईनवर भुयारी मार्गाचे काम २ वर्षापासून प्रलंबित असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने दौंड नगरपरिषदेस प्रस्तावित RUB चे कामासाठी रु.७ कोटी उपलब्ध करून दिले असून सदर कामाची सन २०१३-१४ च्या दरसूचीनुसार अंदाजित किंमत १७ कोटी इतकी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उर्वरित १० कोटींचा निधी वितरीत करून काम पूर्ण करण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-१०-२०१६)** :(१) हे खरे आहे.
(२) व (३) दौड नगरपरिषद हद्दीतील विचाराधीन कामासाठी रु. १५ कोटी मंजूर करण्यात आला असून त्यापैकी रु. ७ कोटी वितरीत करण्यात आले आहेत. तथापी अद्यापही वितरीत रक्कम पूर्णत: खर्ची पडलेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मोहाडी (जि.भंडारा) पोलीस स्टेशनमध्ये लोकप्रतिनिधींना अपमानास्पद वागणूक देण्यात आल्याबाबत**

**(२०) ५२३३२ (२०-०५-२०१६). श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोहाडी (जि.भंडारा) पोलीस स्टेशनचे ए.पी.आय व कॉन्स्टेबल यांनी स्थानिक लोकप्रतिनीधी यांना दिलेल्या अपमानास्पद वागणूकीची तक्रार पोलीस महानिरिक्षक, नागपूर विभाग यांना माहे जुन, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लोकप्रतिनिधींना सौजन्याने वागणूक देण्यासंबंधी शासनाने पोलीस विभागातील कार्यालय प्रमुखांना सुचना दिलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त तक्रारीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१०-२०१६)** :(१) होय,हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी मोहाडी पोलीस स्टेशनचे ए.पी.आय व कॉन्स्टेबल यांनी विधानमंडळ/संसद सदस्यांना सन्मानाची व सौजन्याची वागणूक देण्याबाबतच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १७/१/२०१४ अन्वयेच्या परिपत्रकातील मार्गदर्शक सुचनांचे उल्लंघन केल्याने विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर यांनी दोघानाही वार्षिक वेतनवाढ दोन वर्षाकरीता स्थगित करणे ही शिक्षा दिली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कुळगाव, बदलापूर नगरपालिकेच्या (जि.ठाणे) बीएसयुपी योजनेच्या घरांमध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने बेकायदेशीरपणे विद्युत मीटर दिल्याबाबत

**(२१) ५४४०० (२६-०८-२०१६). श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील कुळगाव, बदलापूर नगरपालिकेच्या बीएसयुपी योजनेच्या घरांमध्ये नगरपालीकेतील अधिकाऱ्यांच्या संगनमताने भाडे घेऊन अनधिकृत व बेकायदेशीर भाडेकरू ठेवल्याचे तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने बेकायदेशीरपणे विद्युत मीटर दिल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय निदशर्नास आले व तद् नुसार बेकायदेशीर भाडेकरू ठेवणाऱ्या नगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कठोर कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०१६) :**(१) हे खरे नाही.

रस्ता रुंदीकरणात बाधित झालेल्या ३१५ कुटूंबानी बीएसयुपी योजनेअंतर्गत घरकुलांचा अचनाकपणे ताबा घेतला याविरुध्द नगरपालिकेने पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केलेली आहे.

नगरपालिकेकडे संक्रमण शिबीर नसल्याने बीएसयुपी योजनेत पात्र ठरत असलेल्या लाभार्थ्यांना तात्पुरती निवास व्यवस्था म्हणून त्याठिकाणी नगरपालिकेच्या नावे विद्युत व्यवस्था करुन दिली आहे. यासाठी कोणतेही भाडे आकारण्यात आलेले नाही.

(२) बी.एस.यु.पी. योजनेच्या अंमलबजावणीबाबत चौकशी करण्याबाबत सुचित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मालेगांव (जि.नाशिक) या शहरात वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी उड्डाणपूल बांधण्याबाबत

**(२२) ५५२७१ (२४-०८-२०१६). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) या शहरात वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी उड्डाणपूल बांधण्यासाठी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १ एप्रिल, २०१६ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदरहू निवेदनावर कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०१६)** :(१) याबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांना दिलेले निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

तथापि, मालेगाव शहरात वाहनांची संख्या वाढली असून, वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी उड्डाणपूल बांधणे आवश्यक असल्याने, निधीच्या उपलब्धतेनुसार सदर उड्डाणपूल बांधण्याचे महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातारा नगरपरिषदेने IHSDP या योजनेंतर्गत १,४७३ घरे मंजूर केल्याबाबत**

**(२३) ५५५५२ (२९-०८-२०१६). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा नगरपरिषदेने IHSDP या योजनेंतर्गत झोपडपट्टीसदृश्य वस्त्यांमध्ये राहणाऱ्या लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी १,४७३ घरे मंजूर केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेंतर्गत अनुसूचित जातीसाठी असणाऱ्या ६९६ घरकुलांपैकी फक्त ४४ घरांचे वाटप झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उर्वरित घरकुलांचे वाटप लवकरात लवकर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-१०-२०१६)** :(१) होय, हे खरे आहे.

(२) सद्य:स्थितीत सातारा नगरपरिषदे कडून एकूण ४२४ घरांचे वाटप करण्यात आले आहे. अनुसूचित जातीसाठी असलेल्या ६९६ घरकुलांपैकी ११० घरांचे वाटप झाले आहे.

(३) व (४) मंजूर प्रकल्पातील १४७३ घरकुलांपैकी ९४४ घरांचे काम सुरु करण्यात आले असून त्यापैकी ७७६ घरकुले पुर्ण झाली आहेत व १६८ घरांची कामे पुर्णत्वाच्या मार्गावर आहेत, ६६७ घरकुलापैकी ४२४ घरकुलांचे वाटप करण्यात आले असून त्यापैकी ११० घरकुलांचे अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले आहे. उर्वरित ३५२ पुर्ण घरकुलांचे लवकरच वाटप केले जाणार असून त्यामध्ये प्राधान्याने अनुसूचित जातीच्या लाभार्थींना घरकुले वाटली जाणारे आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इचलकरंजी नगरपालिकेच्या इंदिरा गांधी मेमोरियल रूग्णालयाबाबत**

**(२४) ५५६४९ (२६-०८-२०१६). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) नगरपालिकेच्या इंदिरा गांधी मेमोरियल रूग्णालयाची दुरवस्था झाली असून वैद्यकीय अधिकारी व औषधे उपलब्ध नसल्यामुळे बहुतांश रूग्णांना उपचारासाठी इतरत्र पाठवले जात असल्याची बाब माहे एप्रिल, २०१६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे रूग्णालय शासनाकडे हस्तांतरीत करून उपजिल्हा रूग्णालय म्हणून चालविण्याचा आदेश मा. मुख्यमंत्री यांनी दिनांक १३ ऑक्टोबर, २०१५ रोजी झालेल्या बैठकीत दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचा प्रस्ताव कॅबिनेट मंत्री मंडळासमोर मंजुरीसाठी सादर करण्याचे आदेश सुध्दा मुख्यमंत्री महोदयांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रस्तावाची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-१०-२०१६) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) होय, हे खरे आहे. सदर प्रकरणी नगरविकास विभागाच्या शासन निर्णय क्र.एमयुपी-२०१५/प्र.क्र.३१०/नवि-१९ दि.३० जून, २०१६ अन्वये रूग्णालय शासनाकडे हस्तांतर करण्यास मान्यता देण्यात आली आहे. याअनुषंगाने कर्मचारी व मालमत्ता हस्तांतर संबंधी पुढील कार्यवाही विहित कालावधीत होण्याबाबत त्रिस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे.

---

**अमरावती जिल्हयातील अशोक शिक्षण संस्थेतील गैरव्यवहाराबाबत**

**(२५) ५५७४३ (२३-०८-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील नामवंत अशोक शिक्षण संस्था काही दिवसापासून विविध कारणाने चर्चेत असून सदर संस्थेने गैरव्यवहार केल्याची तक्रार कुऱ्हा पोलिसात दाखल असूनही अद्याप चौकशी करण्यात आली नसल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संस्थेच्या वरिष्ठांकडून पोलीस यंत्रणेवर दबाव येत असल्यामुळे कारवाई होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-१०-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) सदर प्रकरणी प्रशासन अशोक नगर शिक्षण संस्था, अशोक नगर व माजी मुख्याध्यापक, कुऱ्हा हायस्कूल, कनिष्ठ महाविद्यालय, कुऱ्हा यांनी संस्थेच्या व शासकीय निधीचा अपहार

केल्याबाबतची तक्रार संचालक, अशोक नगर शिक्षण संस्था यांनी पोलीस स्टेशन कुऱ्हा येथे दिली आहे. तथापि तक्रारकर्त्याने संस्थेचा अंकेक्षण अहवाल पोलीसांकडे सादर केलेला नसल्यामुळे पुढील कार्यवाही करता आलेली नाही. तक्रारकर्त्यास संस्थेचा अंकेक्षण अहवाल सादर करण्याबाबत सूचनापत्र देण्यात आलेले असून जिल्हा शिक्षण अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती, धर्मदाय आयुक्त, अमरावती, शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती व संस्थेचे अध्यक्ष यांना संस्थेमध्ये संस्थेच्या व शासकीय निधीचा अपहार झाला अगर कसे याबाबत पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. संबंधितांकडून अपहाराबाबतचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात पोलीसांवर हल्ले होत असल्याबाबत**

**(२६) ५५९७३ (२३-०८-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात नागरिकाचे संरक्षण करणाऱ्या पोलीसांवरच हल्ले होत असून गत साडेतीन महिन्यांत १९७ पोलिसांवर हल्ले झाल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील घटनेत दिवसेंदिवस वाढ होत असून शहराच्या गुन्हेगारीला समाजविघातक कृत्यांना आळा घालण्यापासून रस्त्यावर वाहतुकीचे नियमन करण्यापर्यंतच्या अनेक कामांत पोलीस आणि नागरीक यांचा थेट संबंध येत असल्यामुळे पोलीसांना स्वत:चे संरक्षण करता यावे व होणारे हल्ले रोखण्यात यावे याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-१०-२०१६) :**(१) होय हे खरे आहे.
(२) सर्व पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील मोहल्ला कमिटी, महिला दक्षता कमिटी ,सामाजिक कार्यकर्ते, व्यापारी तसेच इतर व्यावसायिकांच्या वेळोवेळी सभा आयोजित करून पोलिस त्यांचे कायदेशिर कर्तव्य पार पाडत असताना त्यांना कोणत्याही प्रकारे अडथळा आणुन वाद निर्माण करण्यात येऊ नये,नागरिकांनी शिस्त पाळून कायद्याचे आदर करावा,पोलिसांवर हल्ले करू नयेत याकरिता लोकांचे प्रबोधन करण्यात येते पोलिस ठाणेस कार्यरत असलेले सर्व अधिकारी व अंमलदारांना आपले कर्तव्य बजावताना नागरिकांशी सलोख्याने वागण्याबाबत तसेच, अटीतटीची परिस्थिती नियंत्रणात आणण्याबाबत पोलिस महासंसचालक, महाराष्ट्र राज्य यांच्यामार्फत सूचना देण्यात आल्या आहेत. यानंतरही जर पोलीसांवर हल्ला झाला तर अशा प्रकरणात कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात येऊन सखोल चौकशीअंती योग्य व सबळ पुराव्यानिशी गुन्ह्याचे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात येते अशा गुन्ह्यातील

आरोपींना न्यायालयात जास्तीत जास्त शिक्षा होईल याबाबत पाठपुरावा करण्यात येतो तसेच असे हल्ले करणा-या गुन्हेगारांवर प्रतिबंधक कारावाई सुध्दा केली जाते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे शहरातील चार बँकातील वाहन कर्ज गैरव्यवहाराबाबत**

**(२७) ५६३८९ (२३-०८-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील रुपी को.ऑप.बँक, महेश सहकारी बँक, राजगुरु नगर सहकारी बँक, कराड अर्बन बँक या चार बँकातील ८४ तत्कालीन संचालक, प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांविरुध्द विश्राम बाग पोलीस स्टेशनमध्ये दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजी वाहन कर्ज गैरव्यवहार प्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सुमारे साडे तीन कोटी रुपयांचा वाहन कर्ज गैरव्यवहार असून चारही बँका विरुध्द स्वतंत्र गुन्हे नोंदविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-१०-२०१६) :**(१) हे खरे आहे.
सदर प्रकरणी चार बॅकातील ९४ तत्कालीन संचालक, प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवरिध्द विश्राम बाग पोलीस स्टेशन येथे दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजी एकूण ४ स्वतंत्र गुन्हे नोंदविण्यात आलेले आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी विश्राम बाग पोलीस स्टेशन, पुणे येथे खालीलप्रमाणे चार बँकातील तत्कालीन संचालक, प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्याविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

१) रुपी को.ऑप. बँकेच्या, बुधवार पेठ, पुणे या शाखेतील गैरव्यवहार प्रकरणी एकूण १६ आरोपीविरुध्द गु.र.क्र. ९९/२०१६ भांदवि कलम ४२०, ४०६, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील ५ आरोपींना अटक केलेली आहे तसेच उर्वरित आरोपींचा शोध घेण्यात येत आहे. गुन्हा तपासावर आहे.

२) महेश सहकारी बँक लि.पुणे या बँकेतील गैरव्यवहार प्रकरणी एकूण २४ आरोपीविरुध्द गु.र.क्र. १००/२०१६ भादंवि कलम ४२०, ४०६, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा तपासावर आहे.

३) राजगुरुनगर सहकारी बँक लि.पुणे या बँकेतील गैरव्यवहार प्रकरणी एकूण २२ आरोपीविरुध्द गु.र.क्र. ९८ /२०१६ भादंवि कलम ४२०, ४०६, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा तपासावर आहे.

४) कराड अर्बन को.ऑप.बँक लि. बाजीराव रोड, शाखा पुणे या बँकेतील गैरव्यवहार प्रकरणी एकूण ३२ आरोपीविरुध्द गु.र.क्र. ९७/२०१६ भादंवि कलम ४२०, ४०६, ३४ अन्वये दाखल करण्यात आला आहे. गुन्हा तपासावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई शहरातून गत तीन वर्षात १८६३४ तरूणी बेपत्ता झाल्याबाबत**

**(२८) ५६४२३ (२३-०८-२०१६). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशाची आर्थिक राजधानी म्हणून प्रसिध्द असलेल्या मुंबई शहरातून गत तीन वर्षात म्हणजेच १ जानेवारी, २०१३ ते ३१ मार्च, २०१६ या कालावधीत १८६३४ तरुणी बेपत्ता झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१०-२०१६) :**(१) मुंबई शहरातून गत तीन वर्षात म्हणजेच १ जानेवारी, २०१३ ते ३१ मार्च, २०१६ या कालावधीत १८३६४ तरुणी बेपत्ता झाल्याचे खरे नाही.

बृहन्मुंबई मध्ये या कालावधीत १७९७६ मुली/तरुणी/स्त्रिया बेपत्ता झाल्या व यापैकी १६८७० मुली/तरुणी/स्त्रिया मिळून आल्या असून ११०६ मुली/तरुणी/स्त्रिया मिळुन येणे बाकी आहेत.

(२) १) मा.पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या अधिपत्याखाली बृहन्मुंबईतील सर्व पोलीस ठाण्यामध्ये हरविलेल्या मुली/तरुणी/स्त्रिया यांचा शोध घेण्याकरिता विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. यामध्ये अद्यापपर्यंत चांगलेच यश प्राप्त झाले आहे.

२) हरविलेल्या मुली/तरुणी/स्त्रिया यांचा शोध घेण्यासाठी या शाखेकडून बिनतारी संदेश प्रसारीत करुन तसेच पोलीस परिपत्रकात प्रसिध्द देऊन हरविलेल्या तरुणींचा शोध घेण्यासठी सर्व पोलीस ठाणेंना अवगत करण्यात येते.

३) हरविलेल्या मुली/तरुणी/स्त्रिया यांचा शोधासाठी दुरदर्शनवर फोटो प्रसिध्द करण्याकरिता पाठविले जातात व फोटो प्रसिध्द झाल्याची खात्री केली जाते.

४) हरविलेल्या मुली/तरुणी/स्त्रिया यांच्या शोधासाठी बृहन्मुंबईतील सर्व सुधारगृहातून शोध घेतला जातो. तसेच सामाजीक संस्था यांची मदत घेतली जाते.

५) या कार्यालयाकडून हरविलेल्या मुली/तरुणी/स्त्रिया यांची माहिती गॅझेटमध्ये प्रसिध्द केली जाते.

६) प्रत्येक पोलीस ठाणे स्तरावर अधिकारी अंमलदार यांचे विशेष पथक स्थापन करण्यात आले असूर हरविलेल्या मुली/तरुणी/स्त्रियांचा शोध घेण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातात.

७) प्रत्येक पोलीस ठाणे स्तरांवर हरविलेल्या मुली/तरुणी/स्त्रिया यांची माहिती फोटोसहीत www.mumbaipolice.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर भरण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एम्प्लॉयमेंट एक्सचेंजवर नोंदणी केलेल्या उमेदवारांना रोजगार उपलब्ध होत नसल्याबाबत**

**(२९) ५६५८० (२९-०८-२०१६). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे एम्प्लॉयमेंट एक्सचेंजने सन २०१५ मध्ये फक्त तीन अपगांना नोकरी दिली असून मागासवर्गीयांपैकी एकाही उमेदवाराला नोकरीची संधी मिळालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एम्प्लॉयमेंट एक्सचेंजवर नोंदनी करुनही नोकरी न मिळाल्याने सरकारी यंत्रणांकडुन अवहेलना होत असल्याची भावना विशेषतः अंध आणि अपंगांमध्ये बळावली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एम्प्लॉयमेंट एक्सचेंजवर नोंदणी केलेल्या उमेदवारांना रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी निलंगेकर-पाटील (०३-११-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राकडे नोंदणी केलेल्या बेरोजगारांना रोजगार उपलब्ध व्हावा याकरिता शासनामार्फत खालील योजना राबविण्यात येत आहेत.

अ) कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता केंद्रांचे संगणकीकरण.

ब) बेरोजगार उमेदवारांसाठी ग्रंथालय सदृश अभ्यासिका निर्माण करणे.

क) रोजगार मेळावे.

ड) बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्था.

इ) आदिवासी उमेदवारांसाठी रोजगार व स्वयंरोजगार प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्र.

ई) सुशिक्षीत बेरोजगारांसाठी रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम.

उ) महाराष्ट्र राज्यात व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र स्थापन करणे.

ऊ) प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**साखरखेर्डा (ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा) येथील पोलीस ठाण्यातील बीट जमादारासह पोलीस शिपायांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आल्याबाबत**

**(३०) ५६८११ (२३-०८-२०१६). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साखरखेर्डा (ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा) येथील पोलीस ठाण्यातील बीट जमादारासह पोलीस शिपायांविरुध्द माहे एप्रिल, २०१६ मध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुन्हा दाखल केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१०-२०१६) :**(१) होय

(२) व (३) या प्रकरणी बिट जमादार श्री प्रमोद चिखलकर व पोलिस शिपाई रविंद्र गिते पोलिस स्टेशन साखरखेडा जि.बुलढाणा यांनी तक्रारदार यांना त्यांचेविरूध्द कोर्टात चार्जशिट पाठविण्यासाठी झेरॉक्स सेट व इतर खर्चासाठी ५ हजार रूपयाचे लाचेची मागणी केल्याने त्यांचेविरूधद पोलिस स्टेशन सारखरखेर्डा जि.बुलढाणा येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम ७ नुसार गु.र.क्र.६९/२०१६ नोंद करण्यात आला आहे.याप्रकरणी अपचारी यांचेविरूध्द न्यायालयात दोषारोपत्र दाखल करण्याची कार्यवाही विचाराधीन आहे.

---

**सांगली जिल्ह्यातील आटपाडी गावाला नगरपालिका करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(३१) ५७२८६ (२६-०८-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील महत्वाचे ठिकाण असलेल्या आटपाडी गावाला नगरपालिका करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-१०-२०१६) :**(१) होय हे खरे आहे.

(२) आटपाडी ग्रामपंचायतीची नगरपंचायतीमध्ये रूपांतर करण्याबाबतची प्राथमिक उदघोषणा दि.०१/०३/२०१४ रोजीच्या राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली होती. तथापि उदघोषणेस पुरेशी प्रसिध्दी मिळाली नसल्याने दि. ०५/०२/२०१५ रोजी प्राथमिक उदघोषणा पुन्हा प्रसिध्द करण्यात आली. अंतिम उदघोषणा निर्गमित करण्याबाबतची कार्यवाही चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डोंबिवली (जि.ठाणे) येथे घडत असलेल्या चोरीच्या (चैन स्नॅचिग) घटनांबाबत**

**(३२) ५८१२९ (२३-०८-२०१६). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (जि.ठाणे) येथे वृध्द नागरीक तसेच महिला यांना लक्ष करुन चोरी व चैन स्नॅचिंग च्या घटना सतत घडत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ७ मे, २०१६ रोजी रात्री नाना नानी पार्कच्या गेटसमोर, गावदेवी मंदीराजवळ, मानपाडा रोड, डोंबिवली पूर्व (जि. ठाणे) येथे रात्री ११.१५ वाजता श्रीमती रसिलाबेन मुलचंद गाला यांचा २ तोळे ७ ग्रॅम वजनाचा सोन्याचा हार अज्ञात दुचाकीस्वारांनी हिसकावून नेला असून सदर प्रकरणी टिळकनगर पोलीस स्टेशन डोंबिवली पूर्व येथे एफआयआर (FIR NO.I६८/१६) दाखल केली असूनही अद्याप चोरांना पकडण्यात पोलिसांना यश आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त चोरीच्या घटनांचा तपास त्वरित करणे, चोरी झालेल्या सोन्याच्या वस्तू तसेच संबंधित व्यक्तींना रक्कम परत मिळवून देवून अशा घटनांना आळा घालणे, वृध्द तसेच महिलांच्या सुरक्षिततेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१६) :**(१) व (२) सदर प्रकरण डोंबिवली हद्दीतील असून या प्रकरणी टिळकनगर पोलीस स्टेशन मध्ये गु.र.क्र. ६८/२०१६ भा.दं.वि. कलम ३९४, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेसंदर्भात तक्रार प्राप्त होताच, अज्ञात मोटारसायकल स्वारांचा तात्काळ शोध होणेकरिता बिनतारी संदेशामार्फत ठाणे पोलीस आयुक्तालयांतील सर्व नियंत्रण कक्ष यांना माहिती देवून नाकाबंदी करण्यात आली होती. तसेच फिर्यादींनी सांगितल्याप्रमाणे आरोपी यांचे स्केच काढण्यात आले असून त्याचा सर्वत्र शोध घेण्यात येत आहे.

(३) याप्रकरणी बाजारपेठ, गर्दीची ठिकाणे तसेच शाळा, कॉलेजच्या आजुबाजुस चेन स्नॅचिंगच्या घटना घडु नये म्हणून घ्यावयाच्या दक्षतेबाबत बॅनर लावून जनजागृती करण्यात येत आहे. तसेच अचानकपणे पोलीस स्टेशनच्या हद्दीत नाकांबदी लावण्यात येवून संशयित वाहने तपासण्यात येतात. पोलीस ठाणे हद्दीत बीट मार्शल यांना योग्य त्या सूचना देवून गस्त घालण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर येथील २० जण इस्लामिक स्टेटस ऑफ सिरीया (इसिस) या दहशतवादी संघटनेमध्ये सामील होत असल्याबाबतचा संशय आल्याबाबत**

**(३३) ५८१५९ (२३-०८-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर येथील २० जण इस्लामिक स्टेटस ऑफ सिरीया (इसिस) या दहशतवादी संघटनेमध्ये सामील होत असल्याचा संशय राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या अहवालात नमूद करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इसिस संघटनेच्या सक्रिय सदस्यांपैकी दोन जण नगर शहराजवळील एक शिर्डी परिसरातील व तिघे श्रीरामपूर भागातील आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, इसिस दहशतवादी संघटनेमध्ये सामील होणाऱ्यांची वाढती संख्या रोखण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) इसीस या दहशतवादी संघटनेत राज्यातील तरुण दाखल होऊ नयेत म्हणून खालील उपायोजना करण्यात येत आहेत.

अ) दहशतवाद विरोधी पथकाच्या विविध पथकांनी शाळा व महाविद्यालयांना भेटी देऊन विद्यार्थंना दहशतवाद या विषयाबाबत जागृत करुन दहशतवादाबाबत पोलीसांना मदत करण्याचे आवाहन करण्यात आले.

ब) युवकांना दहशतवादी संघटनेमध्ये सामील होण्यापासून परावृत्त करण्यात आले असून त्यांचे समुपदेशन करण्यात आले.

क) राज्यातील अल्पसंख्याक समाजातील धर्मगुरु, मौलवी व विद्वान लोकांशी बैठक घेरुन इसीस या दहशतवादी संघटनेविरोधी अल्पसंख्यांक समाजामध्ये प्रबोधन करण्याची विनंती कण्यात आली आहे.

ड) धार्मिक अस्थिरता निर्माण करणाऱ्या वेबसाईट, सोशल नेटवर्कींग साईटवर लक्ष ठेवले जात असून, अशा वेबसाईट सर्व्हीस प्रोव्हाईडर कंपनीशी संपर्क साधण्यात येत असून धार्मिक असलोखा निर्माण करणाऱ्या इसमांविरुध्द कायदेशीर कार्यवाही करणे तसेच दहशतवादी संघटनांमध्ये ऑनलाईन भरती करीत असल्याचा संशय येत असलेल्या साईटवर लक्ष ठेवण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पंढरपूर शहरातील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(३४) ५८२१३ (२६-०८-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर शहरातील रस्त्यांची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पंढरपूर शहराकरीता कोट्यवधी रुपयांचा निधी नगरपालिकेकडे येतो परंतु विकासकामे करतांना नगरपालिकेकडून चांगल्या दर्जाची कामे केली जात नाही असे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरातील रस्त्यांची दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०१६) :**(१) व (२) पंढरपूर शहरातील रस्त्यांची दुरावस्था होऊ नये म्हणून नगरपरिषदेकडे प्राप्त झालेल्या निधीतून विकास कामे सक्षम प्राधिकरणाची मंजूरी घेऊन करण्यात येतात. तसेच विकास कामांसाठी वापरल्या जाणाऱ्या मटेरीयलची शासकीय प्रयोगशाळेत तपासणी करून घेऊन त्यांचा दर्जा चांगला राखला जाईल याची दक्षता घेतली जाते.
(३) गरजेनुसार नगरपरिषदेमार्फत रस्त्यांची दुरूस्ती करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील माझगांव येथील तांबावाला इमारती शेजारील दोन गाळे जेसीबी आणून विकासकाने तोडल्याबाबत

**(३५) ५८३५९ (२३-०८-२०१६). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील माझगांव येथील तांबावाला इमारती शेजारील दोन गाळे मध्यरात्री जेसीबी आणून तोडल्याप्रकरणी भायखळा पोलिस ठाण्यामध्ये विकासकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच बांधकाम तोडण्याची कोणतीही परवानगी नसताना इमारत परिसरातील फॅक्टरी मध्यरात्री जेसीबीच्या सहाय्याने पाडण्याचा प्रयत्न केला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तांबावाला इमारतीतील रहिवासी हे विकासकाच्या दहशतीखाली राहत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, विकासकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-१०-२०१६) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) नाही, याबाबत भायखळा पो.स्टे. येथे कुठल्याही प्रकारची तक्रार प्राप्त नाही.
(४) सदर प्रकरणी विकासकाविरुध्द भायखळा पो.स्टे. येथे गु.र.क्र.१२६/१६ भा.दं.वि. कलम १४३, १४७, १५३, १५५, ३२३, ३३६, ३४१, ४२७, ४५२, ५०४, ५०६ (१) अन्वये दि. ०१.०५.२०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
तसेच सदरचा गुन्हा फिर्यादी व आरोपी (विकासक) यांच्या संमतीने मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि. १०.०८.२०१६ रोजी रद्द केला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील अंधेरी पश्चिम येथील मैदानावर अतिक्रमण केल्याप्रकरणी एमआरटीपी ॲक्ट अंर्तगत गुन्हा नोंदवण्यात आल्याबाबत

**(३६) ५८४४२ (२३-०८-२०१६). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील अंधेरी पश्चिम येथील नक्षत्र गार्डनच्या बाजूला शासनाच्या मैदानावर संजय परदेशी नावाच्या समाजकंटकाने अतिक्रमण केले असल्यामुळे त्यांच्यावर एमआरटीपी ॲक्ट अंर्तगत गुन्हा नोंदविण्यात आला असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समाजकंटकावर सन २०१५ मध्ये सुध्दा एमआरटीपी ॲक्ट अंर्तगत गुन्हा नोंदवण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एकाच व्यक्तीवर तीनदा एमआरटीपी ॲक्ट अंर्तगत गुन्हा नोंदवण्यात आल्यानंतर त्या व्यक्तीवर एमपीडीए लावण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१०-२०१६) :**(१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) सदर आरोपी विरोधात एम.आर.टी.पी.ॲक्ट अन्वये कारवाई करण्यात आलेल्या असून प्रस्तुत गुन्ह्यांच्या पार्श्वभुमीवर आरोपी विरोधात एमपीडीए ॲक्टनुसार कारवाई करता येत नाही. सबब सदरची कारवाई करण्यात आलेली नाही.

परंतु जुहू पोलीस ठाणे मार्फत नमुद आरोपीवर फौ.दं.प्र.सं. ११० प्रतिबंध कारवाईचा प्रस्ताव मा.विशेष कार्यकारी दंडाधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, सांताक्रुझ विभाग, मुंबई यांचे न्यायालयात सादर करण्यात आला असून सुनावणी चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील ऑर्थररोड तुरुंगात अधिक्षकाकडून बड्या कैद्यांना सोयी-सुविधा उपलब्ध करुन दिल्या जात असल्याबाबत

**(३७) ५८७८९ (२३-०८-२०१६). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील ऑर्थररोड तुरुंगात अधिक्षकाकडून बड्या कैद्यांना सोयी-सुविधा उपलब्ध करुन दिल्या जात असून अण्णाभाऊ साठे महामंडळ घोटाळ्यातील आरोपी आमदार रमेश कदम यांच्यासाठी कारागृहात जीम ट्रेनर उपलब्ध करुन देण्यात आल्याबाबत चौकशी करण्यात यावी अशी मागणी तुरुंगातील वैद्यकिय अधिकारी डॉ.राहूल घुले यांनी एका पत्राद्वारे मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ६ एपिल, २०१६ रोजी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-१०-२०१६)** :(१) हे खरे नाही.

डॉ.राहूल घुले, वैद्यकीय अधिकारी, मुंबई मध्यवर्ती कारागृह यांनी मा.मुख्यमंत्री महोदयास उद्देशून कारागृह अधिक्षक, श्री.भारत भोसले यांच्या मनमानी व गैरकारभाराबद्दल तक्रार अर्ज दिनांक ०६/४/२०१६ रोजी सादर केला.

कारागृह उपमहानिरीक्षक, मध्य विभाग औरंगाबाद यांनी सदर तक्रार अर्जावर चौकशी करुन दिनांक ०२/०५/२०१६ रोजी अहवाल सादर केला आहे. सदर अहवालानुसार अधिक्षक, श्री.भारत भोसले, यांचे कारागृहातील बंदी तसेच प्रशासनावर नियंत्रण नसल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे. तसेच बंद्यास रुग्णालयात उपचारासाठी पाठविणेबाबत नियमभंग केल्याप्रकरणी डॉ.घुले, वैद्यकीय अधिकारी हे दोषी आढळून आले आहेत.

न्या.बंदी, तन्वीर हाश्मी या बंद्यास योगासनाचे ज्ञान असल्याने अधिक्षकांचे परवानगीने त्या अतिसुरक्षा विभागात बंद्यांना योगासने शिकविण्यासाठी पाठविण्यात आलेले आहे. त्याने वैयक्तीकरित्या बंदी रमेश कदम यांना व्यायामाचे प्रशिक्षण दिलेले नाही. त्यामुळे बंदी रमेश कदम यांच्यासाठी कारागृहात जीम ट्रेनर उपलब्ध करुन दिले नाही.

(२) प्रस्तुत प्रकरणी कारागृह उपमहानिरीक्षक, मध्य विभाग, औरंगाबाद यांनी चौकशी करुन दिनांक २/५/२०१६ रोजी अहवाल सादर केला आहे.

चौकशी दरम्यान खालील बाबी निदर्शनास आल्या आहेत.

१. दिनांक २४/२/२०१६ रोजी बंदी रमेश कदम याने अधिक्षकांचे कार्यालयात येवून अधिक्षकांसमोर वैद्यकीय अधिकारी डॉ. घुले यांना शिवीगाळ केली आहे.

२. रजिस्टर क्र. ३२ मध्ये नोंद नसताना बंदी रमेश कदम यास उपचारासाठी बाहेरील रुग्णालयात पाठविणेकरीता श्री.बावीस्कर, तुरुंगाधिकारी यांना पोलीस मागणी पत्रकात बंद्याचे नाव टाकण्याचे आदेश दिले.

३. डॉ.राहूल घुलै, वैद्यकीय अधिकारी यांनी अधिक्षकांच्या सांगण्यावरुन बंद्यांकडे पैशाची मागणी करुन बंद्यास मंडळ क्र. १२ येथे बंदीसाठी पाठविले.

वर नमूद केलेल्या कारणास्तव अधिक्षक, श्री.भारत भोसले यांचे कारागृहातील बंदी तसेच प्रशासनावर नियंत्रण नसल्याचे चौकशीत दिसून आले आहे. त्यामुळे शासनाच्या दिनांक ३१/०५/२०१६ चे आदेशान्वये श्री.भारत भोसले, अधिक्षक, मुंबई मध्यवर्ती कारागृह यांची कल्याण जिल्हा कारागृह येथे बदली करण्यात आली आहे डॉ.घुले, वैद्यकीय अधिकारी यांचे कारागृह विभागातून पुन्हा त्यांचे आरोग्य विभागात मूळ ठिकाणी बदली करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोदावरी नदीच्या शुध्दीकरणाबाबत**

**(३८) ५९३६० (२६-०८-२०१६). श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोदावरी नदी शुध्दीकरणाच्या कामास १५ दिवसांत प्रारंभ करुन दोन महिन्यात नवीन ड्रेनेज लाईन टाका असे आदेश दिनांक १८ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.पर्यावरण मंत्री यांनी नांदेड महानगरपालिका आयुक्तांना दिले, हे खरे आहे काय,

(२) तसेच महानगरपालिकेच्या एकूण निधीपैकी २५ टक्के निधी सांडपाणी व पर्यावरणावर खर्च करण्याचा नियम असतांना नांदेड महानगरपालिकेने सदरचा खर्च केला नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-१०-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आयटीआय कोर्स करणाऱ्या विद्यार्थ्यांना फी सवलत देण्याबाबत**

**(३९) ६०५२० (२९-०८-२०१६). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासन प्रमोद महाजन कौशल्य विकास कार्यक्रम राबवत असून त्या अंतर्गत राज्यातील विद्यार्थ्यांना आयटीआय चे प्रशिक्षण देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) राज्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना आयटीआय चे प्रशिक्षण मिळावे यासाठी सर्व आयटीआयच्या विद्यार्थ्यांना पूर्ण फी सवलत देण्यात यावी अशी मागणी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्र्यांना माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आयटीआय कोर्स करणाऱ्या विद्यार्थ्यांना फी सवलत देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी निलंगेकर-पाटील (०४-११-२०१६) :**(१) हे खरे नाही.

राज्यातील १५ ते ४५ वयोगटांतील उमेदवारांचे अधिक मागणी असलेल्या क्षेत्रांचा अवश्यकतेनुसार कौशल्य विकास करुन त्यांना प्रत्यक्ष रोजगार किंवा स्वयंरोजगार मिळवून देण्याकरीता प्रमोद महाजन कौशल्य विकास अभियान राबविण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) आयटीआयच्या प्रशिक्षणार्थीकडून प्रवेशाच्या वेळी प्रवेश शुल्क तसेच परीक्षा शुल्क आकारण्यात येते. त्यामध्ये पूर्णत: सवलत देण्याची बाब शासनाच्या विचराधिन नाही. तथापि, मा.लोकप्रतिनिधींनी मागणी केल्यानुसार महसूल व वन विभागाकडून ज्या तालुक्यातील ५० पैश्यांपेक्षा कमी आणेवारी असलेल्या गावात दुष्काळ सदृष परिस्थती असल्याचे जाहीर करण्यात येते, त्या गावातील प्रशिक्षणार्थ्यांना परिक्षा शुल्क माफ करण्याची बाब शासनाच्या तपासाधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबरनाथ येथे शहरापासून जवळच असलेल्या आदिवासी पाडयांना मुलभूत सुविधा मिळणेबाबत**

**(४०) ६०५६१ (२६-०८-२०१६). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील अंबरनाथ येथे शहरापासून जवळच असलेल्या आठ ते नऊ आदिवासी पाडयांमधील आदिवासींना मागील अनेक वर्षापासून वीज, पिण्यांकरीता स्वच्छ पाणी, आरोग्य सुविधा, पायवाट, शाळा, शौचालय अशा प्राथमिक सुविधांपासून वंचित रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वातंत्र्यानंतर ६९ वर्षे होवूनही शहरांपासून हाकेच्या अंतरावरील या आदिवासी पाडयांना या सुविधा बरीच वर्षे न मिळण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या प्राथमिक सुविधा मिळण्यासाठी आदिवासींनी अंबरनाथ नगरपालिकेकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या आदिवासी बांधवांना सदर सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०१६) :**(१) व (२) अंबरनाथ शहर हद्दीत एकुण १४ आदिवासी पाडे आहेत, त्यापैकी बहूतेक ठिकाणी वीज, रस्ते, स्वच्छ पाणीपुरवठा, आरोग्य सुविधा, शौचालय, शाळा इत्यादी सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत.

(३) होय, हे खरे आहे.

(४) आदिवासी पाडयांना पुरविण्यात आलेल्या सोयी सुविधा व्यतिरिक्त रस्ते व अन्य सुविधा पुरविण्याबाबत नगरपालिकेचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली शहरात सुभाष मैदानात पार्किंग व्यवस्था उपलब्ध करुन देण्याचा तसेच रस्याच्या दुतर्फा पे-अॅण्ड पार्क योजना राबविण्याचा प्रस्ताव**

**(४१) ६१००३ (२६-०८-२०१६). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली शहरात पार्किंगची समस्या होत आहे, रस्त्यांच्या दुतर्फा करण्यात आलेल्या बेशिस्त पार्किंगमुळे अनेकदा वाहतुक कोंडी निर्माण होत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन महासभेने सुभाष मैदानात पार्किंग व्यवस्था उपलब्ध करुन देण्याचा तसेच रस्याच्या दुतर्फा पे-अॅण्ड पार्क योजना राबविण्याचा प्रस्ताव मंजूर केलेला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती यासंदर्भात मागील दोन वर्षात प्रशासनाने पार्किंगचा प्रश्न सोडविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-१०-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात पार्किंग धोरण निश्चित करण्याकरीता महानगरपालिकेकडून समंत्रकाची नेमणूक करण्यात आली आहे. या समत्रंकाकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार पार्किंगबाबतचे धोरण निश्चित करण्याकरीता महानगरपालिका प्रशासनाकडून महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील महत्वाच्या जागेवर बीओटी तत्वावर व्यापारी संकुल उभे करण्याबाबत**

**(४२) ६१७६७ (२६-०८-२०१६). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील सावित्रीबाई फुले प्रसूतिगृह व समोरील अतिथीगृह इमारत धोकादायक यादीत टाकून तसेच महानगरपालिकेचे शिक्षण मंडळ बरखास्त करुन शाळांच्या ठिकाणी व्यापारी संकुल उभे करण्याचा महानगरपालिकेचा प्रकार माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या प्रकरणाची चौकशी करुन संबंधीत दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-१०-२०१६)** :(१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोल्हापूर शहरातील कचऱ्याची विल्हेवाट लावण्याबाबत

**(४३) ६२०३६ (२९-०८-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरात दिवसाला १७५ मेट्रिक टन कचरा साठत असून सदरचा कचरा टाकण्याकरिता असलेला झूम प्रकल्प बंद पडला आहे तसेच नविन प्रकल्पाकरिता जागा नसुन टाकाळा सायंटीफिक लँडफिल साईटचे काम रखडले असल्याने शहरात कच-याचा प्रश्न गंभीर झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील कच-याची विल्हेवाट लावण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०१६)** :(१) कोल्हापूर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये दैनंदिन निर्माण होणाऱ्या कचऱ्यावर प्रक्रिया करून विल्हेवाटीकरीता मे. कोल्हापूर ग्रीन एनर्जी प्रा.लि. मुंबई यांची दि.०७/०२/२०१४ रोजी नियुक्ती केली आहे. सदर संस्थेला प्रकल्प उभारणीकरिता कोल्हापूर महानगरपालिकेने दि.३०/०४/२०१५ रोजी भाडेकरार करून रि.स.न. २०६, सी.स.नं.२९ ई वॉर्ड कसबा बावडा येथील एकूण ५ एकर जागेचा ताबा देण्यात आला आहे.

(२) कोल्हापूर शहरात दिवसाला साधारणत: १७५ मेट्रीक टन कचरा जमा होतो. शहरांतर्गत निर्माण होणाऱ्या कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्याकरिता कोल्हापूर महानगरपालिकेकडून वेस्ट टू एनर्जी हा प्रकल्प डी.बी.एफ.ओ.टी. तत्वावर उभारण्यात येत असून याकरीता जाहीर निविदा प्रक्रियेद्वारे कोल्हापूर ग्रीन एनर्जी प्रा. लिमीटेड मुंबई यांची सदर प्रकल्पासाठी निवड केली आहे. कचऱ्याच्या विल्हेवाटी करीता स्वमालकीच्या टाकळा येथील जागेमध्ये शास्त्रोक्त पध्दतीने भूमीभरण क्षेत्र विकसित करण्याचे काम पूर्ण झाले आहे. महानगरपालिकेअंतर्गत नागरी घनकचऱ्यावर प्रक्रीया करून ५ टन क्षमतेचे दोन बायोगॅस प्लॅट उभारण्या बाबतची कार्यवाही सुरू आहे. तसेच दि कोल्हापूर शुगर मिल यांच्या मालकीची बावडा येथील सरवळ लगुन्सची जागा भुमीभरणासाठी उपलब्ध झाली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोल्हापूर महापालिकेतील तब्बल तीन हजार कर्मचारी खाजगी सावकारीच्या पाशात अडकल्याबाबत

**(४४) ६२०६१ (२६-०८-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर महापालिकेतील तब्बल तीन हजार कर्मचारी खाजगी सावकारीच्या पाशात अडकल्याचे तसेच ही सावकारी कोण चालविते याबाबतची माहिती वरिष्ठ अधिका-यांकडे असल्याचे माहे एप्रिल, २०१६ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार आतापर्यंत किती खाजगी सावकारांना अटक करण्यात आली आहे वा येत आहे,
(३) तसेच त्यास पाठींबा देणा-या महापालिकेतील वरिष्ठ अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०१६) :**(१) अशा स्वरूपाची बातमी स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रकाशित झाली होती. तथापि, याबाबत कोणत्याही कर्मचारी अथवा नागरीक यांच्याकडून महानगरपालिकेकडे तक्रार दाखल केलेली नाही. महानगरपालिकेमार्फत कर्मचाऱ्यांचे वेतन बँकेत जमा करण्यात येते.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वाडा (जि.पालघर) तालुक्यातील ग्रामपंचायतीस नगरपंचायतीचा दर्जा देण्याबाबत

**(४५) ६२२३९ (११-०८-२०१६). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाडा (जि.पालघर) तालुका औद्योगिक दृष्ट्या झपाट्याने विकसीत होत असून या भागात १००० हून अधिक लहान मोठे कारखाने व मोठ्या प्रमाणावर नागरीकरण होत असल्याने वाडा ग्रामपंचायतीस नगरपंचायतीचा दर्जा देणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार वाडा ग्रामपंचायतीस नगरपंचायतीचा तात्काळ दर्जा मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-१०-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) वाडा जिल्हा पालघर ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रुपांतर करण्याबाबतची प्राथमिक उदघोषणा दि.०१/०३/२०१४ रोजी करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### ठाणे येथे महिला कॉन्स्टेबलला केलेल्या मारहाण प्रकरणाचा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालविण्याबाबत

**(४६) ६२३२९ (२३-०८-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथे एका राजकीय पक्षाच्या शाखा प्रमुखाने एका महिला कॉन्स्टेबलला माहे एप्रिल, २०१६ मध्ये केलेल्या मारहाण प्रकरणी राज्य महिला आयोगाने हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात महिला न्यायाधिशासमोर चालवावा आणि विशेष सरकारी वकील म्हणून ज्येष्ठ महिला वकीलाची नियुक्ती करावी अशी मागणी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महिला आयोगाच्या या मागणीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-१०-२०१६) :**(१) नाही. मात्र सदस्य सचिव (प्रभारी) महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांनी अपर मुख्य सचिव (गृह) यांना या संदर्भात जर नियमांत असेल व आवश्यकता भासल्यास या प्रकरणी ॲड रोहिणी सालीयन यांची सेवा विशेष सरकारी वकील म्हणून देण्याकरिता संबंधितांना शासन स्तरावर निर्देश द्यावतेत अशी विनंती दिनांक ०३.०३.२०१६ च्या पत्रान्वये केली होती.

(२) प्रस्तुत प्रकरणी विधी व न्याय विभागाच्या दिनांक २२.४.२०१६ च्या पत्रान्वये ॲड संगिता फड यांची विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्ती करण्यात आली असल्याचे पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांच्या दिनांक ०२.०६.२०१६ च्या या विभागास पाठविण्यात आलेल्या पत्रावरुन दिसून येते. तसेच याव्यतिरिक्त या विभागाकडून राज्य महिला आयोगाची शिफारस विचारात घेऊन ॲड रोहिणी सालीयन यांची विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्ती करण्याची कार्यवाही विधी व न्याय विभागाच्या सल्ल्याने करण्याबाबत प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोल्हापुर शहराच्या सुरक्षिततेसाठी राबविण्यात आलेल्या सीसीटीव्ही प्रकल्पाचे काम सदोष झाल्याबाबत

**(४७) ६२४६९ (२९-०८-२०१६). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापुर शहराच्या सुरक्षिततेसाठी राबविण्यात आलेल्या सीसीटीव्ही प्रकल्पाचे काम सदोष झाले असून सीसीटीव्ही कॅमेरे चोरीस जाणे, गरजेपेक्षा जास्त कॅमेरे बसविणे, उच्च दाब वीज वाहीन्यांवरून केबल टाकणे, ठरविलेल्या जागेवर कॅमेरे न बसविणे अशा त्रुटी माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज पुरवठा खंडीत झाल्यास सदर कॅमेरे बंद राहत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पात मोठी अनियमितता झाली असून त्रयस्थ कंपनीमार्फत चौकशी करण्याची मागणी अनेक संस्थांनी कोल्हापुर महापालिकेकडे नोंदवली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-१०-२०१६) :**(१) नाही, हे खरे नाही. सदर प्रकल्पाचे काम ३१/०३/२०१६ रोजी पूर्ण झाले असून अद्याप एकही कॅमेरा चोरीला गेलेला नाही. पोलीस खात्यासोबत संयुक्त सर्वे करून आवश्यकतेनुसार प्रकल्प सल्लागार यांनी संख्या व ठिकाण ठरविलेली आहेत.

(२) हे खरे नाही. वीज पुरवठा खंडीत झाल्यास ३० मिनिटे बॅकअप उपलब्ध होऊ शकेल अशा युपीएसची सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे.

(३) होय हे खरे आहे.

(४) शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे व आय.आय.टी पवई या संस्थांना प्रकल्पाचे गुणवत्ता तपासणी करणेबाबत दि.१९/०७/२०१६ रोजीच्या पत्रान्वये लेखी कळविले आहे. तसेच महानगरपालिकेच्या तांत्रिक लेखा परिक्षण करणेचे काम डॉ. डी.वाय.पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरींग यांचेमार्फत केले जात आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर येथील जिल्हा कारागृहात काही कैद्यांनी तुरुंग अधिकारी आणि सुभेदारांवर प्राणघातक हल्ला केल्याबाबत**

**(४८) ६२७५५ (२४-०८-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर येथील जिल्हा कारागृहात काही कैद्यांनी तुरुंग अधिकारी आणि सुभेदारांवर लोखंडी रॉडने प्राणघातक हल्ला केल्याचे दिनांक २१ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०००) :**(१) होय

(२) यासंदर्भात शहर पो.स्टेशन, चंद्रपुर येथे संबंधीत बंद्यांवर गु.र.क्र.२३३/२०१६, कलम ३५३, ३३२, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे व सुरक्षीतेचा उपाय म्हणुन या गैरवर्तन प्रकरणातील दोन न्यायाधीन बंद्यांना अमरावती व नागपूर मध्यवर्ती कारागृह येथे वर्ग

करण्यात आलेले आहे. तसेच सदर घटनेबाबत संबंधीत न्यायालय व वरीष्ठ कार्यालयास अधीक्षक,चंद्रपूर जिल्हा कारागृह यांचेमार्फत घटनेचा अहवाल सादर करण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दौंड रेल्वेवरील (ता.दौंड,जि.पुणे) कुरकुंभ मोरीचे काम अनेक वर्षापासून प्रलंबित असून रेल्वे प्रशासन सदर काम करण्यास निष्काळजीपणा करत असल्याबाबत**

**(४९) ६२८५७ (२४-०८-२०१६). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौंड रेल्वेवरील (ता.दौंड, जि.पुणे) कुरकुंभ मोरीचे काम अनेक वर्षापासून प्रलंबित असून रेल्वे प्रशासन सदर काम करण्यास निष्काळजीपणा करत असल्याचे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत कुरकुंभ मोरीचे काम पूर्ण करण्यासाठी शासन त्वरित काय कार्यवाही करणार वा करित आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-१०-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) दौड नगरपरिषद हद्दीतील विचाराधिन कामासाठी रु. १५ कोटी मंजूर करण्यात आला असून त्यापैकी रु. ७ कोटी वितरीत करण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येरवडा मध्यवर्ती कारागृहत केवळ चार डॉक्टर कार्यरत असल्याबाबत**

**(५०) ६४२५९ (२३-०८-२०१६). श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येरवडा मध्यवर्ती कारागृहात सुमारे साडेसहा हजार कैद्यांसाठी केवळ चार डॉक्टर तपासणीसाठी उपलब्ध आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कैद्याला डॉक्टरांची गरज भासल्यास किंवा विषबाधेसारखी परिस्थिती उद्भवल्यास कारागृह प्रशासनाकडे तातडीची वैद्यकीय यंत्रणा उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-१०-२०१६) :**(१) होय.
(२) हे खरे नाही.येरवडा मध्यवर्ती कारागृहाच्या हॉस्पीटल विभागात प्राथमिक स्वरूपातील तातडीची यंत्रणा उपलब्ध आहे व अचानक विषबाधा व इतर परिस्थिती उद्भवल्यास दोन

वैद्यकीय अधिकारी दिवसा व रात्री एक वैद्यकीय अधिका-यास कर्तव्य नेमून देण्यात आलेले आहे.त्यांचेकडून तातडीने वैद्यकीय तपासणी व प्राथमिक उपचार करणेसाठी कारागृह अधिनस्त रूग्णवाहीकेच्या मदतीने कारागृह शिपाई / पोलिस पथक यांचे मार्फत ससून सर्वोपचार रूग्णालय पुणे येथे पाठविले जाते.

(३) शासनाने बंद्यांच्या आरोग्य सेवेसाठी एक रूग्णवाहीका कारागृह रूग्णालयास उपलब्ध करून दिली आहे.शिवाय २४ तास वैद्यकीय अधिकारी उपलब्ध आहेत तसेच पुरेसा औषधांचा साठा उपलब्ध आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.